(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)



१९५१

२६ नोव्हेंबर

# आदमजी उमर दलाल

# विरुद्ध

# द स्टेट ऑफ बॉम्बे

[न्यायमूर्ती सैयद फ़झल अली, न्यायमूर्ती मेहर चंद महाजन आणि न्यायमूर्ती विवियन बोस ]

*फौजदारी संपरीक्षा - शिक्षादेश - द्रव्यदंड बसवणे - मार्गदर्शक तत्वे - आरोपीची परिस्थिती - अपराध आणि दंड यांच्यातील समानुपात - कारावासासह खूप जास्त द्रव्यदंडाची निर्भत्सना करणे - काळा बाजार -शिक्षा- सर्वोच्च न्यायालयाची कार्यप्रणाली - फौजदारी अपील (अनेक) - शिक्षादेशात हस्तक्षेप.*

शिक्षेचा योग्य प्रमाण निश्चित करणे हा बऱ्याचदा मोठ्या अडचणीचा मुद्दा असतो आणि कोणताही पक्का नियम निर्धारित करता येत नाही; हा विवेकबुद्धीचा विषय असल्याने मार्गदर्शनाकरिता विविध मुद्दे विचारार्थ घेतले पाहिजेत, परंतु न्यायालयाने नेहमीच अपराध आणि दंड यांच्यातील समानुपाताची आवश्यकता लक्षात ठेवली पाहिजे.

द्रव्यदंड बसवताना गुन्ह्याचे स्वरूप आणि गांभीर्याप्रमाणेच आरोपी व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीची सुद्धा तेवढीच काळजी घेणे आवश्यक आहे आणि अपवादात्मक प्रकरणे वगळता, जेथे दीर्घ कालावधीसाठी कारावास दिला जातो, तेथे त्यासोबत खूप जास्त द्रव्यदंड लादला जाऊ नये.

सध्या या देशात काळाबाजारीचा गुन्हा अगदी सामान्यपणे प्रचलित आहे आणि जेव्हा तो एखाद्या व्यक्तीविरुद्ध सिद्ध होतो, तेव्हा शिक्षेच्या बाबतीत कोणतीही सौम्यता दाखविली जाऊ नये आणि काही प्रमाणात कठोरता अतिशय योग्य असू शकते आणि अगदी आवश्यक देखील असू शकते, तरीही जेव्हा दीर्घ कारावासाची शिक्षा विशेषकरून अडत्याला देण्यात

आली आहे, तेव्हा प्रकर्तेच्या बाबतीत कदाचित न्याय्य असेल असा खूप जास्त द्रव्यदंड गैरवाजवीपणे बसविण्याची मागणी केली जात नाही.

ज्या प्रकरणांमध्ये शिक्षा अनावश्यक कठोर असतात आणि न्यायाच्या उद्दिष्टांना खरोखर पुढे नेत नाहीत, ती अपवादात्मक प्रकरणे वगळता, गुन्ह्यांसाठी लादण्यात आलेल्या शिक्षेच्या बाबतीत, विशेष अनुमती द्वारे हस्तक्षेप करणे ही सर्वोच्च न्यायालयाची कार्यप्रणाली नाही. [न्यायालयाने या प्रकरणांमध्ये हस्तक्षेप केला आणि लादलेले द्रव्यदण्ड खूप जास्त होते आणि ते गुन्ह्यांच्या प्रमाणाबाहेर होते, या आधारावर शिक्षा कमी केली.]

फौजदारी अपिलीय अधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक ५४-५५/१९५१.

दिनांक ११ एप्रिल, १९५१ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने (न्यायमूर्ति श्री. बावडेकर आणि न्यायमूर्ति श्री. चैनानी) फौजदारी अपील क्रमांक ८८-८९/१९५१ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध अपील (अनेक)

अपीलकर्त्यासाठी श्री. एच. जे. उमरीगर

उत्तरवादीसाठी श्री. जिंद्र लाल

दिनांक : २६ नोव्हेंबर १९५१

**न्यायमूर्ति श्री. महाजन** यांनी दिलेले न्यायनिर्णय :- विशेष अनुमतीद्वारे केलेले हे दोन अपील केवळ शिक्षेच्या प्रश्नापुरते मर्यादित आहेत. खटला क्रमांक १७८३/पी /१९५० मध्ये, ज्यापासून फौजदारी अपील क्रमांक ५४/१९५१ उद्भवले, अपीलकर्ता आदमजी उमर दलालवर इतर पाच व्यक्तींसह पुढील दोषारोपांवर खटला चालवण्यात आला :

"सर्वप्रथम, तुम्ही बॉम्बे येथे, दिनांक २९ डिसेंबर १९४९ रोजी किंवा त्या सुमारास, अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियम, १९४६ अन्वये दिनांक २७/०१/१९४६ रोजी जारी केलेल्या सरकारी अधिसूचना क्रमांक ३४२/IV बी चे उल्लंघन करून, ५० बॅरल केरोसिन तेलाच्या बॅरलचे 'हाई स्पीड डीजल ऑयल' म्हणून चुकीचे वर्णन करून किंवा चुकीचे वर्णन करून घेऊन, सदर तेलाचे बॅरल रेल्वेने बॉम्बे राज्यातून जालना येथे जे बॉम्बे राज्याच्या हद्दी पलीकडे आहे, तेथे कोणताही परवाना नसताना निर्यात करण्याचा प्रयत्न केला

आणि त्याद्वारे अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियम, १९४६  च्या कलम ७ आणि ८ अंतर्गत दंडनीय अपराध केला.

दुसरे म्हणजे, तुम्ही बॉम्बे येथे, दिनांक २९ डिसेंबर १९४९ रोजी किंवा त्या सुमारास, ५० बॅरल केरोसिन तेलाच्या बॅरलचे 'हाई स्पीड डीजल ऑयल' म्हणून चुकीचे वर्णन करून किंवा चुकीचे वर्णन करून घेऊन त्याचा रेल्वेने निर्यात करण्याचा प्रयत्न केला आणि सदर अपराधासाठी एकमेकांस प्रवृत्त केले आणि त्याद्वारे भारतीय रेल्वे अधिनियमाच्या कलम १०६ आणि १०७ सह भारतीय दंड संहितेच्या कलम ११४  अंतर्गत दंडनीय अपराध केला.

खटला क्रमांक १७८४/पी/१९५० आणि १७८५/पी/१९५० मध्ये, अपीलकर्त्यावर त्याच व्यक्तींसह अनुक्रमे ५० आणि १५ बॅरल केरोसिन तेलाच्या इतर दोन लॉटच्या संदर्भात समान दोषरोपाबद्दल खटला चालवला गेला. या दोन खटल्यांमुळे अपील क्रमांक ५५/१९५१ उद्भवले आहे.

ज्या परिस्थितीत ही तीन प्रकरणे उद्भवली ती  पुढीलप्रमाणे आहे :-  दिनांक २९ डिसेंबर १९४९ रोजी वाडी बंदरकडून ५०, ५० आणि १५ बॅरलचे तीन माल पाठवणीसाठी 'हाई स्पीड डीजल ऑयल' अश्या वर्णनाखाली बुक करण्यात आले होते, जेव्हा प्रत्यक्षात त्यात केरोसीन तेल होते आणि ते जालना येथे पाठवण्यात येणार होते. या वस्तुस्थितीची माहिती मिळताच पोलिसांनी रेल्वेचे मालडबे उघडले आणि त्यामध्ये ठेवलेले बॅरल ताब्यात घेतले. आरोपी क्रमांक २, ३ आणि ४ हे कमिशन एजंट्सच्या फर्मचे सदस्य आहेत. त्यांनी तीन वेगवेगळ्या प्रकर्त्यांच्या वतीने सनबीम ऑईल कंपनीकडून तेलाचे बॅरल खरेदी केले होते. पहिला आरोपी यांपैकी एका फर्मचा प्रतिनिधी आहे.  आरोपी क्रमांक ५ आणि ६ हे पुरवठाकार कंपनीचे गोदाम रक्षक आणि सहाय्यक गोदाम रक्षक  आहेत. जप्त केलेल्या सर्व बॅरलवर 'प्रकाश ट्रेडर्स हाई स्पीड डीजल ऑयल, यू. एस. ए' अशी खूण होती. तिसऱ्या आरोपीने १०० बॅरल काढण्यासाठी दोन लॉरी कामी लावले आणि सदर  बॅरल लॉरींमध्ये भरून सत्तार लतीफ या साक्षीदाराकडे पोचवले, जो वाडी बंदर येथे फॉरवर्डिंग आणि कार्टीन्ग एजन्ट होता. १५ बॅरलच्या तिसऱ्या लॉटसह हैदराबाद राज्यातील जालनासाठी या बॅरल्सच्या बुकिंगसाठी तिसऱ्या आरोपीने त्याला निर्देश दिले होते. पहिल्या आरोपीच्या वतीने खरेदी केलेल्या ५० बॅरल्सशी संबंधित असलेल्या माल पाठवणी पत्रामध्ये त्याची फर्म प्रेषक म्हणून

दाखवण्यात आली होती आणि प्रेषिती स्वतः होता. माल पाठवणी पत्रावर सत्तार लतीफ याची स्वाक्षरी होती. या कागदपत्रांमध्ये सदर वस्तूंचे वर्णन 'हाई स्पीड डीजल ऑयल' असे करण्यात आले होते. इतर दोन मालाच्या संदर्भात तत्सम माल पाठवणी पत्र आणि जोखिम पत्र तयार केल्या होत्या. बॉम्बे राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी केरोसिनच्या निर्यातीवर बंदी होती. सर्व बॅरल्सवर पांढरा रंग लावला होता. ते नवीन दिसत होते आणि बॅरल वरील रंगाच्या खाली "केरोसीन ऑईल" हे शब्द दिसत होते. या तथ्यांच्या आधारे, अभियोग पक्षाने सर्व सहा आरोपींविरुद्ध वर नमूद केलेल्या दोषारोपांवर अनुक्रमे ५०, ५० आणि १५ बॅरलच्या तीन खेपांच्या संदर्भात तीन स्वतंत्र खटले सुरू केले. या सर्वांनी दोषी नसल्याची कबुली दिली. या सर्वांनी निर्दोष असल्याचे दावे केले.

पाचव्या आरोपीने सांगितले की आरोपी क्रमांक २ आणि ३ यांनी त्याच्याकडे हाई स्पीड डीजल तेल पोचविण्यासाठी डिलिव्हरी ऑर्डर दिले, परंतु त्यांच्या विनंतीनुसार त्याने त्यांना केरोसीन तेल पोचविले. पहिल्या आरोपीने कबूल केले की, त्याने त्याच्या फर्मच्या वतीने दुसऱ्या आरोपी द्वारे ६५ बॅरल हाई स्पीड डीजल ऑयल ऑर्डर केले होते, परंतु केरोसिन तेलाच्या अभिकथित डिलिव्हरी बद्दल सर्व माहिती त्यांनी नाकारली. दुसऱ्या आरोपीने सांगितले की, त्याने सनबीम ऑईल कंपनीला ६५ बॅरल डीजल तेल ऑर्डर केले आणि कंपनीकडून डिलिव्हरी ऑर्डर प्राप्त केला आणि तिसऱ्या आरोपीला देऊन त्याला कंपनीच्या गोदामातून बॅरलची डिलिव्हरी घेण्यासाठी पाठवले. पाचव्या आरोपीला डीजल ऐवजी केरोसीन तेल देण्यास सांगितल्याचे त्याने नाकारले. तिसऱ्या आरोपीने दुसऱ्या आरोपीच्या सूचनेवरून बॅरेलची डिलिव्हरी घेतल्याची आणि त्या दोन लॉरींमध्ये वाडी बंदरला पाठवल्याची कबुली दिली. बॅरलमध्ये केरोसीन आहे हे ऐकून त्याला आश्चर्य वाटले. डीजल तेलाऐवजी केरोसीन तेल पोचविण्यासाठी आपण कंपनीला कधीही सांगितले होते हे त्याने नाकारले. चौथ्या आरोपीने सांगितले की त्याने व्यक्तीश: व्यवहारात भाग घेतला नाही आणि कोणताही गुन्हा केलेला नाही. सहाव्या आरोपीने सांगितले की त्याने पाचव्या आरोपीच्या आदेशानुसार बॅरेलची डिलिव्हरी केली आणि त्याने कोणताही गुन्हा केलेला नाही. विद्वान इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांनी आरोपी क्रमांक २, ३ आणि ५ यांना त्यांच्याविरुद्ध लावलेल्या

दोषारोपांवर दोषी ठरवले आणि आरोपी क्रमांक १, ४ आणि ६ यांची निर्दोष मुक्तता केली कारण त्यांना त्यांच्याविषयी काही शंका वाटत होती.

या दोन अपीलांमध्ये अपील कर्त्याला (आरोपी क्रमांक ३) पुढीलप्रमाणे शिक्षा देण्यात आली:-

१. खटला क्रमांक १७८३- पी /१९५० मध्ये, त्याला अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियमाच्या कलम ७ आणि ८ अंतर्गत सहा महिन्यांच्या सश्रम कारावासाची आणि रुपये १५,०००/- च्या द्रव्य दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. दंड भरण्यात कसूर झाल्यास त्याला सहा महिन्यांचा सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागणार होती. भारतीय रेल्वे अधिनियमाच्या कलम १०६ अंतर्गत त्याच्यावर १,०००/- रुपयाचे द्रव्य दंड बसवण्यात आले आणि क़सूर झाल्यास त्याला एक महिन्याचा कारावास भोगावा लागणार होता.

२. खटला क्रमांक १७८४-पी / १९५० मध्ये, अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियमाच्या कलम ७ आणि ८ अंतर्गत सहा महिन्यांच्या सश्रम कारावासाची आणि रुपये १५,०००/- च्या द्रव्य दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. दंड भरण्यात कसूर झाल्यास त्याला सहा महिन्याच्या सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागणार होती. रेल्वे अधिनियमांतर्गत त्याच्यावर १,०००/- रुपयाचे द्रव्यदंड बसवण्यात आले आणि क़सूर झाल्यास त्यालाएक महिन्याचा कारावास भोगावा लागणार होता.

३. खटला क्रमांक १७८५-पी /१९५० मध्ये, अत्यावश्यक पुरवठा (तात्पुरते अधिकार) अधिनियमाच्या कलम ७ आणि ८ अंतर्गत त्याला एक दिवसाच्या कारावासाची शिक्षा आणि रुपये १०,०००/- च्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आणि कसुर झाल्यास सहा महिन्याच्या सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागणार होती. रेल्वे अधिनियमांतर्गत त्याला ३०० रुपयांचा द्रव्य दंड बसवण्यात आला आणि कसूर झाल्यास त्याला एक महिन्याचा कारावास भोगण्याचा आदेश देण्यात आला. परिणामी, या ११५ बॅरल तेलाच्या संदर्भात कारावासाच्या शिक्षेव्यतिरिक्त अपीलार्थी वर एकूण रुपये ४२,३००/- चे द्रव्यदंड बसवण्यात आले. विद्वान इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांनी शिक्षादेश लादताना खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले :-

"अशा काळ्या बाजाराचे व्यवहार जेव्हा आढळून येतात तेव्हा ते चिरडले पाहिजेत, अन्यथा सामान्य माणसाला या प्लेगपासून सुटका नाही ".

अपील केल्यावर पाचव्या आरोपीवर बसवलेला द्रव्यदंड माफ करण्यात आला, हा अपवाद वगळता दोषसिद्धी आणि शिक्षा कायम ठेवण्यात आली. उच्च न्यायालयाने असे मानले की, ज्या पद्धतीने हा गुन्हा करण्यात आला होता आणि ज्या उद्देशाने केरोसीन बॉम्बे राज्याबाहेर पाठवण्याचा प्रयत्न होता, जो स्पष्टपणे काळ्या बाजारात विकण्याचा होता, त्या दृष्टीने दिलेली शिक्षा अतिशयोक्ती मानली जाऊ शकत नाही. शिक्षेचा योग्य प्रमाण निश्चित करणे हा बऱ्याचदा मोठ्या अडचणीचा मुद्दा असतो आणि कोणताही पक्का नियम निर्धारित करता येत नाही; हा विवेकबुद्धीचा विषय असल्याने मार्गदर्शनाकरिता विविध मुद्दे विचारार्थ घेतले पाहिजेत, परंतु न्यायालयाने नेहमीच अपराध आणि दंड यांच्यातील समानुपाताची आवश्यकता लक्षात ठेवली पाहिजे. द्रव्यदंड बसवताना गुन्ह्याचे स्वरूप आणि गांभीर्याप्रमाणेच आरोपी व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीची सुद्धा तेवढीच काळजी घेणे आवश्यक आहे आणि अपवादात्मक प्रकरणे वगळता, जेथे दीर्घ कालावधीसाठी कारावास दिला जातो, तेथे त्यासोबत खूप जास्त द्रव्यदंड लादला जाऊ नये. आम्हाला असे वाटते की, सदर प्रकरणांमध्ये या विचारांकडे योग्य लक्ष दिले गेले नाही आणि काळाबाजारीची दुष्टता चिरडण्याच्या आणि सामान्य माणसाला या प्लेगपासून मुक्त करण्याच्या उत्साहामुळे शिक्षेचे प्रमाण निश्चित करण्यात न्यायिक विवेक अस्वस्थ झाले आहे.

अपीलकर्ता या व्यवहारांमध्ये प्रथम आरोपी आणि इतर प्रकर्त्यांच्या वतीने कमिशन एजन्सी फर्मचा सदस्य या नात्याने काम करत होता. आमच्यासमोर ठामपणे असे सांगण्यात आले होते की, या व्यवहारामध्ये त्याचे कमिशन विक्री मूल्याचा अर्धा टक्का होता. आरोपीच्या आर्थिक स्थितीबद्दल अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. त्याच्या विद्वान अधिवक्त्याने न्यायालयात ठामपणे सांगितले की, इतक्या जास्त द्रव्यदंडाचे एक अंशही भरणे त्याच्यासाठी अशक्य होते. काळ्या बाजारात तेलाच्या विक्रीतून मिळणारा नफा सर्वसाधारणपणे व्यावसायिक व्यवहारांमध्ये प्रकर्त्याकडे जाईल, परंतु त्याची व्याप्ती माहीत नाही आणि अभिलेखावर सुद्धा आढळत नाही. या युक्तीद्वारे केरोसीन तेल मिळवून नफा कमावणारा पहिला आरोपी निर्दोष मुक्त झाला आहे आणि तो आमच्यापुढे नाही. ज्या इतर व्यक्तींच्या

वतीने तेल खरेदी करण्यात आले होते, त्यांच्यावर खटला चालवला गेला नाही. या परिस्थितीत अपीलकर्त्याला भारी द्रव्यदंड बसवण्याचे समर्थन करणारे कोणतेही साहित्य अभिलेखावर नाही आणि हे आम्हाला गुन्ह्यांच्या प्रमाणाबाहेर आहे असे दिसते.

सध्या या देशात काळाबाजारीचा गुन्हा अगदी सामान्यपणे प्रचलित आहे आणि जेव्हा तो एखाद्या व्यक्तीविरुद्ध सिद्ध होतो, तेव्हा शिक्षेच्या बाबतीत कोणतीही सौम्यता दाखविली जाऊ नये आणि काही प्रमाणात कठोरता अतिशय योग्य असू शकते आणि अगदी आवश्यक देखील असू शकते, तरीही जेव्हा दीर्घ कारावासाची शिक्षा अगदी अपीलकर्त्यास देण्यात आली आहे जो कमिशन एजन्सी वर्गातील व्यक्ती आहे, तेव्हा प्रकर्तेच्या बाबतीत कदाचित न्याय्य असेल असा खूप जास्त द्रव्यदंड गैरवाजवीपणे बसविण्याची मागणी त्याच्या बाबतीत केली जात नाही. ज्या प्रकरणांमध्ये शिक्षा अनावश्यक कठोर असतात आणि न्यायाच्या उद्दिष्टांना खरोखर पुढे नेत नाहीत, ती अपवादात्मक प्रकरणे वगळता, गुन्ह्यांसाठी लादण्यात आलेल्या शिक्षेच्या बाबतीत, विशेष अनुमती द्वारे हस्तक्षेप करणे ही सर्वोच्च न्यायालयाची कार्यप्रणाली नाही.

वर दिलेल्या कारणांमुळे आम्हाला वाटते की, दंडाधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यावर बसवलेले आणि उच्च न्यायालयाने कायम ठेवलेले द्रव्यदंड सर्व प्रकरणांमध्ये जर खालीलप्रमाणे कमी केले तर ते न्यायाच्या उद्दिष्टांची पूर्तता करेल.

खटला क्रमांक १७८३-पी /१९५० मध्ये द्रव्य दंडाचे शिक्षादेश रु. १५,००० पासून रु. १,००० एवढे कमी करण्यात येते आणि चूक झाल्यास त्याला एका महिन्याच्या कालावधीसाठी कारावास भोगावा लागेल.

खटला क्रमांक १७८४-पी/१९५० मध्येही द्रव्य दंड रु. १५,००० पासून रु. १,००० एवढे कमी करण्यात येते आणि चूक झाल्यास त्याला एक महिन्याचा कारावास भोगावा लागेल.

त्याचप्रमाणे, खटला क्रमांक १७८५-पी / १९५० मध्ये द्रव्य दंडाचे शिक्षादेश रु. १,००० पर्यंत कमी करण्यात येते आणि चूक झाल्यास त्याला एक महिन्याचा कारावास भोगावा लागेल.

भारतीय रेल्वे अधिनियमांतर्गत सर्व प्रकरणांमध्ये द्रव्य दंडाची रक्कम रुपये २,३०० ऐवजी एकूण रुपये १,००० एवढी कमी करण्यात येते आणि चूक झाल्यास त्याला एक महिन्याचा कारावास भोगावा लागेल. इतर सर्व बाबतींत अपील निष्फळ ठरतात आणि फेटाळली जातात.

शिक्षादेश कमी करण्यात आले.

अपीलकर्त्याचे प्रतिनिधी : श्री. गणपत राय

उत्तरवादीचे प्रतिनिधी : श्री. पी. ए. मेहता

------------

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X